केला आहे त्याने थोडीशी करमणूक ... स्वामींची खाजगी निमंत्रणा... ही भेट वरवर दिसते तितकी ... । रशिया व चीन या दोन ... समान अंतरावर राहून ... बपायचे ही भूमिका स्वामी ... स्वाबीत आहेत. चिनी नेत्यांनी ... घातली आहे असे वाटण्या... आणि कढ येऊन ते चीन... असे मुंबईतील त्यांच्या ... वाटले. चीनसंबंधी त्यांनी ... माहिती दिली आहे ती देखील ... याची गरज आहे. उदाहरणार्थ, ... विकासाच्या दृष्टीने बघितल्यास चीन ... बरोबरी करू शकतात असे सर... स्वामींनी म्हटले आहे ते कसे मान्य ... उपभोग्य मालाच्या उत्पादनात ... पुढे आहे, याउलट पोलाद व ... उत्पादनात चीन भारतापेक्षा फारफार ... त्यांचे विधान स्वीकारायला ... चीनमध्ये मोटारी नाहीत ही ... नाही, पण सायकलीला एक ... मोजावे लागतात, ही माहिती ... व धक्कादायक आहे । खिशात ... बाळगावे तशा सायकली तेथे बाळ... असता त्यांची किंमत एवढी असेल ... रेडिओ, टी. व्ही. ही आम जनतेच्या ... पोषण्याची साधने चीनने सहेतुक... ठेवली असली तर नवल नव्हे, ... कम्युनिस्ट राजवटीचा खरा आधार ... प्रचार हाच असू शकतो. किमान व ... १५० रु. ते ५०० रु. आहे 'बोनस' ... पद्ध्यापी, चीज चीनमध्ये नाही ... सेवानिवृत्त होताना शेवटच्या वेतनाच्या ... पेन्शन बसते, या गोष्टी आपल्या... दाखल करण्याजोग्या आहेत. तांदूळ ... किलो आणि गहू २ रु. किलो ... दखल राजनारायण प्रभृतींनी ... आवश्यकता आहे. फळविके, न्हावी ... कम्युनिस्ट सरकार पगारी नेमते. ... सुमारे ३०० रु. मिळतात आणि ... मिळकत सरकारात जमा करावी ... हजामत करवून घेण्याचे स्वातंत्र्य ... त्याचवेळी हजामत करणाराची ... सरकारच्या हाती ठेवणे, ही काय गंमत ... बोध स्वामींच्या प्रवचनातून ... । प्रश्न इतकाच की स्वामी तरी ... स्वामी' आहेत की कोणाच्या तरी ... बाबत गहिवराने बोलत आहेत ?

◎ ◎

# शेतकरी-शेतमजूर पंचायतीचे यशस्वी शिबिर

**बा. न. राजहंस**

राणीचे बांबरूड म्हणजे जळगाव जिल्ह्यातले आडवळणाचे गाव. पक्का रस्ता नाही. गावापर्यन्त एस्. टी. पोचत नाही. आमदार ओंकार वाघ यांच्या नेतृत्वाखाली या गावात शेतकरी-शेतमजूर पंचायतीचे काम गेले अनेक वर्षे चाललेले. गावातल्या ७० भूमिहीनांना पंचायतीने जमीनी मिळवून दिलेल्या.

एकोणीस ते पंचवीस सप्टेंबरपर्यन्त शेतकरी-शेतमजूर पंचायतच्या महाराष्ट्र शाखेचे शिबिर येथे सात दिवस चालू होते. सतत सात दिवस या गावात चैतन्य वास्तव्य करीत होते. उत्तरेला भंडारा जिल्ह्यापासून ते दक्षिणेस कोल्हापूरपर्यन्तचे सुमारे ७० कार्यकर्ते शिबिरास आले होते. ग्रामीण भागातील गरिबांचे प्रश्न समजावून घ्यावयाचे व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटन व जरूर तर आंदोलन कसे करायचे याची चर्चा मुख्यत: या शिबिरात झाली. शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे रोजगार मंत्री श्री निहाल अहमद यांनी केले. या प्रसंगी निहाल अहमद यांनी शेतकरी-शेतमजूर पंचायतीच्या कार्यकर्त्यांनी रोजगार हमी योजना राबवण्याचे कामी सरकारला सहकार्य करावे असे आवाहन करून योजनेत किंवा तिच्या अंमलबजावणीत असलेल्या उणीवा आपल्या नजरेस आणल्यास आपण त्या तत्काळ दूर करू असे आश्वासन दिले.

यानंतर सतत सहा दिवस येथे अनुभवाचे आदानप्रदान–ज्ञानसत्र चालू होते. सांगलीचे सत्यवान कुंभारकर यांनी रोजगार हमी कामावर येणाऱ्या अडचणी, कामांची मापे, पगाराचे वाटप यासंबंधीचे अनुभव सांगितले. म्हैसाळचे श्री मोमीन यांनी स्त्रियांना असमानतेने वागवण्यात येते, याबद्दल चीड व्यक्त केली. कोल्हापूरचे अरुण सोनाळकर यांनी धरणाखाली जमीन गेल्यामुळे भूमिहीन झालेले कसे दुर्लक्षित राहिले आहेत याचे विदारक अनुभव सांगितले. परभणीचे लढाऊ कार्यकर्ते रामराव जाधव यांनी परभणी विद्यापीठातील शेतमजुरांच्या लढ्याचे, तेथील अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या वागण्याचे अनुभव कथन केले. यवतमाळचे गोविंदराव बुचके व पुसदचे यडदकर यांनी अद्यापही ह्या जिल्ह्यात हजारदारांचे महत्व कसे कायम आहे व कमाल जमीनधारणेचा कायदा झाला असूनही अद्याप काही जमीनदारांनी कायद्यातील पळवाटांचा उपयोग करून भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने शेकडो एकर जमीन ठेवली असल्याची उदाहरणे दिली. हे बडे लोक शेतकरी–शेतमजूर पंचायतच्या कार्यकर्त्यांना त्रास व दमदाटया करतात व राजवट बदलली असली तरी पोलीस अधिकारी अद्यापही त्यांच्याच कलाने वागत असतात अशा तक्रारी त्यांनी केल्या.

चंद्रपूरचे रहिमतुल्ला, जळगावचे ईश्वर पाटील व कोंगे यांनी जंगल अधिकाऱ्यांच्या बेमुर्वतखोरपणाची उदाहरणे सांगितली: आदिवासींनी जंगलात केलेली पिके नष्ट करू नयेत असा शासनाचा आदेश असूनही चोपडा भागातील वनअधिकाऱ्यांनी त्यांची पिके नष्ट केल्याचे श्री कोंगे यांनी सांगितले तर शासनाचे आदेश फक्त धुळे व नासिक जिल्ह्यापुरते मर्यादित असल्याचे अधिकारी सांगतात अशी तक्रार ईश्वर पाटील यांनी केली. जंगल अतिक्रमणाबद्दलचे खटले काढून घेण्याचे शासनाचे धोरण असताही अद्याप चंद्रपूर व राधानगरी या भागात शेकडो आदिवासी व धनगरांवर खटले चालू असल्याच्या तक्रारी येथील कार्यकर्त्यांनी केल्या.

अल्पभूधारकांच्या अडचणी, दुष्काळ भागातील शेतीला पाणी पुरवण्याचा प्रश्न, छोटया शेतकऱ्यांच्या उत्पादनाला भाव कसे मिळाले याबद्दलच्या अनेक समस्यांसंबंधी माणचे श्री दिगंबर कारंडे व अप्पासाहेब जाधव महाडचे श्री शांताराम फिंलसे, भंडाऱ्याचे श्री ढवळे, सेलूचे गोविंद कालेगावकर वगैरे कार्यकर्त्यांनी आपापले अनुभव कथन केले.

शेतमजुराना किमान वेतन देणे छोटया शेतकऱ्यांना परवडेल का? असाही प्रश्न

काही कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. ह्या प्रश्न विचारणारांनी शेतमजुराला त्याच्या तुटपुंज्या वेतनात घर चालवणे परवडेल किंवा नाही याचा विचार करावयास पाहिजे, असे अकोल्याचे डॉ. दिनकर राळे यांनी उत्तर दिले. शेतकऱ्यांनी मजुरांना कमी वेतन देण्याऐवजी आपल्या मालाला योग्य भाव मिळवण्यासाठी लढण्यास शिकले पाहिजे व त्या कामी शेतमजूर त्यांना मदत करतील असा या चर्चेचा निष्कर्ष निघाला.

शिबिरात आलेल्या कार्यकर्त्यांना जमीन-विषयक कायदे, रोजगार हमी ह्या योजना, किमान वेतनाचा कायदा व शेत-मजुरांच्या सामाजिक कल्याणाचे प्रश्न, ग्रामीण भागातील सामाजिक विषमता व अंधश्रद्धा, आदिवासींचे प्रश्न व आदिवासी उप-योजना, दुष्काळी भागात पाणीपुरवण्यासाठी धोरणात करावयाचे बदल, अल्पभूधार-कांच्या समस्या व त्यांच्यासाठी असलेल्या विविध सरकारी योजना या विषयांवर निरनिराळ्या वक्त्यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. जळगावचे श्री कल्याणी वकील, महाजन वकील. डॉ. बाबा आढाव, श्री पन्नालाल सुराणा व. प्रो. शरद कुलकर्णी आणि डॉ. रत्नाकर महाजन यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. येथील कामाची आखणी करण्याचे काम श्री गोपाळराव गायकवाड, रत्नाकर महाजन व संजीव चव्हाण यांनी केले. या सर्व चर्चेचे सार म्हणून शेवटच्या दिवशी एक निवेदन सादर करण्यात आले.

(१) कमाल जमीन कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

(२) रोजगार हमीची कामे पाच मैलांच्या परिसरात काढावी व ह्यावरील मजुरी वाढवून द्यावी.

(३) शेत-मजुरांचे किमान वेतन कोरडवाहू भागात रोज पाच रुपये व बागायत भागांत साडेसात रु. असावे.

(४) ३१ मार्च १९७८ पर्यंत आदिवासींना केलेल्या जंगलातील व अन्य सरकारी जमिनी त्यांचेनावे कायम कराव्या.

(५) अल्प-भूधारकाची व्याख्या बदलून दुष्काळी भागातील गरीब शेतकऱ्यांना या सवलतीचा फायदा द्यावा.

(६) सरकारी धरणांचे पाणी बारमाही पिकांना न देता ते एका किंवा दोन पिकांना देऊन दुष्काळी शेतीस पाणीपुरवठा करण्याचे दृष्टीने शासनाने पाणीपुरवठा धोरण बदलावे.

(७) छोट्या शेतकऱ्यांचा कर्जाचा विचार करून ज्यांना कर्ज फेडणे शक्य नाही त्यांचे कर्ज माफ करावे व बाकीच्यांना व्याजात सूट किंवा लांब मुदतीचे हप्ते इत्यादी सवलती द्याव्या.

(८) भात, ज्वारी, भुईमूग इत्यादी पीके करणाऱ्यांनादेखील त्यांच्या पिकांचे लाभ-दायक भाव बांधून द्यावे.

या मागण्यांचा प्रचार करण्यासाठी ता. २० ऑक्टोबर रोजी मागणी दिन साजरा करण्याचे व त्यासाठी महाराष्ट्रात किमान १०० सभा घेण्याचे ठरले. तसेच या मागण्या सरकारने वेळीच पूर्ण केल्या नाहीत तर ह्यावर जरूर तर आंदोलन करण्याचेही ठरले, येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्रात शेतकरी-शेत-मजूर पंचायतचे ५०,००० सभासद नोंदवण्याचा कार्यकर्त्यांनी निर्धार केला.

महाराष्ट्र शासनाचे योजना सल्लागार श्री वि. स. पागे यांनी शिबिराचा समारोप केला. त्यांनी रोजगार हमी योजना ही कल्पना कशी जन्मास आली व तिच्यातील क्रान्ति-कारक आशय समजून सांगितला. तसेच शेतकरी–शेतमजूर पंचायतच्या कार्यकर्त्यांनी एका पाटाखाली येणाऱ्या पाचदहा गावांची सर्वंकष विकास योजना बनवली तर ती सर्व कामे रोजगार हमी योजनेखाली घेण्यासाठी आपण प्रयत्न करू असे त्यांनी आश्वासन दिले. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक तरी अशी योजना बनवण्याचा निर्धार सर्वांनी केला. ◎ ◎

## खुलासा

साधनाचे संपादक श्री
यांच्यावर दिनांक २५ सप्टे
करण्याचा प्रयत्न फसला
यांच्या सौजन्याचा गैरफा
बेसावधपणे हा हल्ला झाला
वरची चार मंडळी जमताच
णारांचे पळून जाणे हे त्या
वृत्तीला साजेसेच होय.
श्री थत्ते यांना किरकोळ मार
अंगावर शाई शिपडण्या
निषेधाचा हा बाळबोध मार्ग
णारांची कीव करावी तेवढी
श्री यदुनाथ थत्ते यांनी घडल्या
माहिती पोलिसांना दिली. अ
या प्रसंगानंतर श्री थत्ते यां
कार्यक्रम नेहमीप्रमाणे सुरू
त्यांचे सर्व नियोजित कार्यक्रम
वेळी पार पडतील. श्री थत्ते य
भेट घेऊन अनेकांनी विचार
तसेच श्री थत्ते यांची चौकशी
पत्रे व फोन येत आहेत. सर्वांच्या
साठी खुलासा :
श्री थत्ते यांची प्रकृती ठीक अ
पूर्वी ठरलेल्या कार्यक्रमानुसा
गावी दौऱ्यावर गेले आहेत
दाखवलेल्या जिव्हाळ्याबद्दल
धन्यवाद ! —


# साधना दिवाळी अंक १९७८

**विविध भारतीय भाषांतील निवडक कथा**

**आणि**

**स्नेहलता रेड्डी यांचे नाटक 'सीता'**

मराठी अनुवाद : **सरिता पदकी**

मुखपृष्ठावर बहुरंगी चित्र.

पृष्ठे सुमारे १५० : किंमत रु. ६

**एजन्टांनी आपली मागणी ७ ऑक्टोबरपर्यंत नोंदवावी**